दैनिक
यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १९३ वा ● रविवार ०३ डिसेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 193 | Date : 03/12/2023 | blow :Sunday | Page 4 | Price 4

गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

फळपिकांचा विमा भरण्याची अंतिम मुदत वाढवली

योजनेत सहभागी होण्याचं कृषीमंत्र्याचं आवाहन

मुंबई : शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. रब्बी हंगामातील ज्वारीसह आंबा, काजू, संत्रा आदी फळपिकांचा पीकविमा भरण्याच्या अंतिम तारखेत वाढ करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना विमा योजनेत भाग घेण्यासाठी पिक विमा पोर्टल दिनांक ४ व ५ डिसेंबर २०२३ रोजी सुरू राहणार आहेत. कोकणातील आंबा, काजू, संत्रा, रब्बी ज्वारी या पिकांसाठी पिक विमा योजनेत भाग घेण्याचा अंतिम दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ होती. त्यामध्ये आता वाढ करण्यात आली आहे.

फळपिकांचा पीकविमा भरण्याची अंतिम तारीख ही ३० नोव्हेंबर होती. मात्र काही शेतकरी विविध तांत्रिक अडचणींमुळं पीकविमा भरू शकले नाहीत, याचा विचार करून केंद्राकडे विनंती केली होती. त्यानंतर यामध्ये वाढ करण्यात आली असून दिनांक ४ आणि ५ डिसेंबर या दोन दिवसात वरील पिकांचा विमा भरता येणार आहे. उर्वरित शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा विमा भरुन या योजनेत सहभागी व्हावं असे आवाहन राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे. पिक विमा पोर्टल मधील काही समस्यांमुळे विमा योजनेत भाग घेऊ शकणारे इच्छुक शेतकरी योजनेत भाग घेण्यापासून वंचित राहिले होते. मात्र, आता मुदत वाढ मिळाल्यामुळं शेतकऱ्यांना एक प्रकारचा दिलासा मिळाला आहे. त्यांना भाग घेण्याची संधी देण्यासाठी राज्य शासनाच्या विनंतीला केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. आता दिनांक चार व पाच डिसेंबर २०२३ असे दोन अतिरिक्त (वाढीव) दिवस पिक विमा पोर्टल या पिकांच्या सहभागासाठी सुरू राहणार आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत शासनाने हवामानावर आधारित फळपिक योजना सुरु केली आहे. या अंतर्गत आंबा, काजू, केळी या फळ पिकांचा समावेश आहे. ही योजना कर्जदार शेतकऱ्यांसाठी सक्तीची असून बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे.

नागरी संरक्षण संहिता, न्याय संहिता, पुरावा विधेयक, हिवाळी अधिवेशनात सर्वांच्या नजरा असणार या विधेयकांवर

मुंबई : सोमवार ४ डिसेंबरपासून संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे. या कालावधीत केंद्र सरकार सात नवीन आणि ११ प्रलंबित मोठी विधेयके सादर करण्यात येतील. या सर्व विधेयकांवर चर्चा केली जाईल. हिवाळी अधिवेशन ४ डिसेंबरपासून सुरू होत असून ते २२ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. मात्र, यादरम्यान काही विधेयके अशी आहेत ज्यांची सर्वाधिक चर्चा होत आहे. भारतीय न्यायिक संहिता विधेयक २०२३, भारतीय नागरी संरक्षण संहिता विधेयक २०२३ आणि भारतीय पुरावा विधेयक २०२३ हे संसदेत सादर होणार्या प्रमुख विधेयकांपैकी आहेत. त्याचवेळी हिवाळी अधिवेशनापूर्वी सरकारने शनिवारी (२ डिसेंबर) सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. यामध्ये राजकीय पक्षांच्या नेत्यांनी हिवाळी अधिवेशनाच्या अजेंड्यावर चर्चा केली. संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ही बैठक बोलावली होती. या बैठकीत काँग्रेस, भाजपसह सर्वच पक्षांच्या नेत्यांचा समावेश करण्यात आला होता.

बिझनेस स्टँडर्डच्या अहवालानुसार, 'सेंट्रल गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स (द्वितीय दुरुस्ती) विधेयक' हे सरकारने सूचीबद्ध

केलेल्या सात नवीन विधेयकांमध्ये समाविष्ट केले आहे. याद्वारे जीएसटी कौन्सिलच्या शिफारशी लागू केल्या जातील.

तेलंगणात केंद्रीय आदिवासी विद्यापीठ स्थापन करण्यासाठी विधेयक आणले जाईल. जम्मू-काश्मीर आणि पुदुचेरीच्या विधानसभांमध्ये महिला कोटा निश्चित करण्यासाठी सरकार दोन विधेयके आणणार आहे.

जवळपास १०० वर्षे जुना बॉयलर कायदा, १९२३ पुन्हा लागू करण्यासाठी सरकारने बॉयलर विधेयक, २०२३ सूचीबद्ध केले आहे. या माध्यमातून लोकांच्या जीविताचे रक्षण होणार आहे. तसेच 'तात्पुरते कर संकलन विधेयक, १९३१' पुन्हा लागू करण्यासाठी 'अस्थायी कर संकलन विधेयक, २०२३' सूचीबद्ध केले आहे. ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसेस रेग्युलेशन बिल, २०२३ सूचीबद्ध केले गेले नाही कारण त्यावर शिफारसी मागवल्या गेल्या आहेत. त्याच वेळी, विरोधक भारतीय न्याय संहिता विधेयक २०२३, भारतीय नागरी संरक्षण संहिता विधेयक २०२३ आणि भारतीय पुरावा विधेयक २०२३ च्या हिंदी नावांवर आक्षेप नोंदवण्याची शक्यता आहे.

गेल्या आठवड्यात, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून ही विधेयके त्वरित मंजूर करण्यात घाई करू नये, अशी विनंती केली होती.

निरंतर शिक्षण हेच प्रत्येक विद्यार्थ्याचे ध्येय असावे : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा १११ वा दीक्षान्त समारंभ

नागपूर : भारतीय मूल्यांना अनुसरून सर्वांना उच्च व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मूळ उद्देश आहे. यामुळे देश एक वैश्विक ज्ञानशक्ती (ग्लोबल नॉलेज पॉवर) म्हणून स्थापित होईल,असा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज येथे व्यक्त केला. औपचारिक पदवी हे शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट नसून वेगाने बदल घडणाऱ्या जगात निरंतर शिक्षण हेच प्रत्येक विद्यार्थ्याचे ध्येय असावे, असे आवाहनही त्यांनी केले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत कविवर्य सुरेश भट सभागृहात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या १११ व्या दीक्षान्त समारंभाचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस होते तर केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी आदी यावेळी उपस्थित होते.

तंत्रज्ञान आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक असून त्यामुळे सर्व क्षेत्रात बदल घडत आहेत, असे सांगून राष्ट्रपती म्हणाल्या तंत्रज्ञानाच्या सदुपयोगाने देश व समाजाचे हित जोपासले जाऊ शकते तर त्याच्या दुरुपयोगाने मानवतेचे नुकसान होऊ शकते. सध्याच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) उपयोग आपले जीवन सुकर करत आहे परंतु यातून निर्माण होणारा डीपफेकसारखा प्रकार सामाजिक स्वास्थासाठी अत्यंत घातक आहे. तंत्रज्ञानाच्या चुकीच्या उपयोगाने निर्माण होणाऱ्या समस्येच्या पार्श्वभूमीवर नैतिक शिक्षणाचा मार्ग उपकारक असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची शतकी वाटचाल उच्च परिमाणे स्थापित । पान २ वर

पंतप्रधान चार डिसेंबर रोजी महाराष्ट्र दौऱ्यावर

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी चार डिसेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र दौऱ्यावर असणार आहेत. संध्याकाळी ४.१५ वाजता महाराष्ट्रातील सिंधुदूर्गला पोहोचतील आणि राजकोट किल्ल्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण करतील.

त्यानंतर सिंधुदूर्ग येथे 'नौदल दिन २०२३' कार्यक्रमाला पंतप्रधान उपस्थित राहतील. पंतप्रधान भारतीय नौदलाची जहाजे, पाणबुड्या,विमाने आणि विशेष दलांची प्रात्यक्षिके सिंधुदुर्गातील तारकर्ली किनाऱ्यावरून पाहतील.

दरवर्षी चार डिसेंबर रोजी नौदल दिन साजरा केला जातो. सिंधुदूर्ग येथील 'नौदल दिन २०२३' सोहळा छत्रपती शिवाजी महाराजांच्या समृद्ध सागरी वारशाला आदरांजली अर्पण करत आहे. पहिली स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांतचे पंतप्रधानांनी जलावतरण केले तेव्हा शिवरायांच्या राजमुद्रेपासून प्रेरणा घेत साकारण्यात आलेल्या नौदलाच्या नव्या ध्वजाचा भारतीय नौदलाने स्वीकार केला आहे. दरवर्षी, नौदल दिनानिमित्त,भारतीय नौदलाची जहाजे, पाणबुड्या, विमाने आणि विशेष दलांद्वारे 'कार्यान्वयन प्रात्यक्षिके' आयोजित करण्याची परंपरा आहे. ही 'कार्यान्वयन प्रात्यक्षिके' लोकांना भारतीय नौदलाने हाती घेतलेल्या बहु-क्षेत्रीय मोहिमांचे विविध पैलू पाहण्याची संधी देतात. हे राष्ट्रीय सुरक्षेप्रती नौदलाच्या योगदानावर प्रकाश टाकते, तसेच नागरिकांमध्ये सागरी जनजागृतीचा प्रसारही करते.

दुष्काळाची दाहकता कमी करण्यासाठी सामाजिक संस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा : डॉ.नीलम गोऱ्हे

पुणे : कमी पावसामुळे राज्य शासनाने १५ जिल्ह्यांतील ४० तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला असून या क्षेत्रातील दुष्काळाची दाहकता कमी करण्यासाठी स्वयंसेवी, सामाजिक संस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे प्रतिपादन विधानसभेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. महाराष्ट्र दुष्काळ निवारण आणि मदत कार्यक्रम समिती व स्त्री आधार केंद्र पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विभागीय आयुक्त कार्यालयात दुष्काळ निवारण

अंमलबजावणीबाबत आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत त्या बोलत होत्या.यावेळी महाराष्ट्र दुष्काळ निवारण आणि मदत कार्यक्रम समितीचे (एमडीआरएसपी) शिरीष कुलकर्णी व स्त्री आधार केंद्राच्या अपर्णा पाठक, गौतम गालफाडे, झेलम जोशी, राज्यातील विविध ठिकाणच्या सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, राज्यात यावर्षी दुष्काळाची तीव्रता अधिक आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीतील पर्जन्याची तूट, उपलब्ध असलेल्या भूजलातील कमतरता आदी निकष लक्षात घेऊन १५ जिल्ह्यातील २४ तालुक्यात गंभीर तर । पान २ वर

आमदार प्रकाश सोळंके यांच्या रत्नसुंदर मेमोरियल रुग्णालयाचा परवाना कायमस्वरुपी रद्द

बीड : बीड जिल्ह्याचे माजलगावचे अजित पवार गटाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या रत्नसुंदर मेमोरियल रुग्णालयाचा परवाना कायमस्वरुपी रद्द करण्यात आला आहे. प्रकाश सोळंके यांच्या पत्नी अध्यक्ष या रुग्णालयाच्या अध्यक्ष आहेत. माजलगाव शहरातील बायपास रोडवर रत्नसुंदर मेमोरियल हॉस्पिटलला २०२१ मध्ये परवाना देण्यात आला होता. १०० बेड्सचे हे रुग्णालय आहे. पण वास्तविक पाहता या ठिकाणी

कोणत्याही प्रकारचे रुग्णालय अस्तित्वाच नसल्याची तक्रार सुभाष नाकलगाकर यांनी बीड जिल्हा रुग्णालयाचे शैल्यचिकीत्सक डॉक्टर अशोक बडे यांच्याकडे केली. त्यानंतर या रुग्णालयाची चौकशी करण्यात आली. या चौकशीमधून रुग्णालय अस्तित्वात नसल्याची बाब समोर आली. त्यामुळे त्यांच्या रुग्णालयाचा परवाना रद्द करण्यात आला.

माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या माध्यामातून शहरातील सर्वे नंबर ३७२ ही जागा वादग्रस्त असूनही त्या ठिकाणी या रुग्णालयाचे । पान २ वर

'मुख्यमंत्री- माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानाचा ५ डिसेंबरपासून प्रारंभ : शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर

मुंबई : राज्यातील शाळांमध्ये पायाभूत सोयीसुविधा वाढविणे, शाळांमध्ये शिक्षणाबाबत स्पर्धात्मक वातावरण तयार करणे, निर्णय प्रक्रियेत विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे, आरोग्य, पर्यावरण, कौशल्य विकास, आर्थिक साक्षरता या विषयांवर उपक्रम राबविण्यासाठी शाळांना प्रोत्साहित करणे यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानाचा ५ डिसेंबरपासून प्रारंभ करण्यात येणार आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली. जवाहर बालभवन येथे आज पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल उपस्थित होते.

या अभियानासोबतच दत्तक शाळा योजना, महावाचन उत्सव- महाराष्ट्रातील वाचन चळवळ, माझी शाळा माझी परसबाग, स्वच्छता मॉनिटर टप्पा - २ या उपक्रमांचा शुभारंभदेखील ५ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वाजता राज्यस्तरीय कार्यक्रमात राजभवन, मुंबई येथे करण्यात येणार आहे, असे मंत्री श्री.केसरकर यांनी सांगितले.

याबाबत माहिती देताना मंत्री श्री. केसरकर म्हणाले, उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थानी राज्यपाल रमेश बैस असणार आहेत. तर उपक्रमांचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार असणार आहेत. तसेच विशेष अतिथी म्हणून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, कृषी मंत्री धनजंय मुंडे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा उपस्थित राहणार आहेत. हे अभियान बृहन्मुंबई महानगरपालिका आणि अ व ब वर्गाच्या महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळा आणि उर्वरित महाराष्ट्रातील शाळा अशा स्तरांवर राबविण्यात येणार आहे. महानगरपालिका क्षेत्रात विभाग व राज्यस्तर, तर उर्वरित महाराष्ट्रात तालुका, जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर विजेती शाळा निवडण्यात येणार आहे. या अभियानातून २ कोटी मुलांपर्यंत पोहोचण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी सर्व स्तरावरील समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.। पान २ वर

संपादकीय

मराठा मंडळाची गरज..

मराठ्याविना राष्ट्रगाडा न चाले, खरा वीरवैरी पराधीनतेचा, महाराष्ट्र आधार या भारताचा. महाराष्ट्रातील सगळ्या मराठीजनांचा ऊर अभिमानाने भरून येईल, अशा या चैतन्यपंक्ती थोर विचारवंत आणि समाजसुधारक सेनापती बापट यांनी लिहून ठेवल्या आहेत. पण आजची महाराष्ट्राची परिस्थिती पाहिली तर मराठी माणसे आरक्षणाचा विषय घेऊन एकमेकांविरोधात आक्रमक झालेली दिसत आहेत. त्यातून काही ठिकाणी हिंसाचार पेटला. त्यात आता मराठा, ओबीसी, धनगर, आदिवासी असे विविध समाजगट आरक्षणाच्या मुद्द्यावरून आक्रमक झालेले दिसत आहेत. ही आक्रमकता आणि एकमेकांवरील आरोप-प्रत्यारोप अधिक प्रखर होत चालले आहेत. आरक्षणावरून नेते एकमेकांविषयी बोलताना एकेरीवर येत आहेत. राज्यातील सगळ्या मराठी लोकांनी एकत्र येऊन काही वर्षे लढा दिला आणि संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती केली. महाराष्ट्र हा शब्द तेव्हाच उदयाला आला. संयुक्त महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सगळ्या मराठी माणसांनी एकत्र येऊन आपला विकास आणि उत्कर्ष साधावा यासाठी विकासाच्या अनेक योजना हाती घेतल्या. इतकेच नव्हे तर सगळ्या मराठी भाषिकांनी साहित्यिक आणि सांस्कृतिक विकास साधावा यासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. आरक्षणातून आपला विकास साधला जाईल, असे आता प्रत्येकाला वाटत आहे. त्यामुळे त्यांना मिळाले तर माझ्या जातीलाही आरक्षण मिळाले पाहिजे, ही भावना उसळून उठत आहे. त्यातूनच मग मराठे म्हणतात आम्हाला ओबीसी म्हणून आरक्षण द्या. ओबीसी म्हणतात, त्यांना आमच्यात घुसवून तुम्ही आमची गैरसोय कशाला करता? धनगर समाज म्हणतो, आम्हाला आदिवासी म्हणून आरक्षण द्या. तर आदिवासी म्हणतात, त्यांना आमच्यात घुसवून आमची गैरसोय करू नका. असे सगळे समाजगट जातीच्या नावावर वेगळे होऊन आक्रमक झालेले आहेत. त्यातून मार्ग कसा काढायचा, याचे राज्य सरकारसमोर आव्हान उभे राहिलेले आहे. ज्यावेळी भविष्याकडे पाहिल्यावर दिशा दिसत नाही, तेव्हा भूतकाळातील एखादा आदर्श आपल्याला मार्गदर्शन करू शकतो. जेव्हा मराठा सरदार आपापसात लढू लागले तेव्हा पहिले बाजीराव पेशवे यांनी मराठा मंडळाची स्थापना केली. मराठा सरदारांनी एकमेकांविरोधात लढू नये, असा करार केला. आज महाराष्ट्रात मराठीजनांची आरक्षणावरून आपापसात सुरू असलेली लढाई पाहता पुन्हा अशाच मराठा मंडळाची गरज आहे, असे वाटते.

पान १ वरुन

निरंतर शिक्षण हेच प्रत्येक विद्यार्थ्याचे

करणारी ठरली असून समृद्ध वारसा जोपासणाऱ्या या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी जीवनाच्या विविध क्षेत्रात महत्त्वाचे योगदान दिल्याचा गौरवास्पद उल्लेख करुन राष्ट्रपती म्हणाल्या, विद्यापीठाचे माजी विद्यार्थी अनेक क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्यांचे सहाय्य घेऊन विद्यापीठाला ग्लोबल सेंटर ऑफ एक्सलंस बनवावे.या विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू केले हे प्रशंसनीय आहे. देशाच्या विकासात संशोधन व नाविन्यतापूर्ण शिक्षणाची मोलाची भूमिका असून हे विद्यापीठ संशोधन, नाविन्यतापूर्ण शिक्षण व तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देत आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे या विद्यापीठातील फॅक्लटी मेंबर्सच्या नावाने ६७ हून अधिक पेटंटची नोंदणी झालेली आहे. विद्यार्थ्यांमध्ये स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष कक्ष निर्माण केला आहे. स्थानिक प्रश्न आणि गरजा लक्षात घेऊन संशोधनावर भर द्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

सर्व जग आज ग्लोबल व्हिलेज झाले असून कुठलीही संस्था जगापासून अलिप्त राहू शकत नाही. आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम आणि आंतरराष्ट्रीय सहयोगावर विद्यापीठाने भर द्यावा असे सांगून त्या म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी स्थानिक समस्या व गरजांनुसार नाविन्यपूर्ण संशोधनाला प्राधान्य दिले तरच जागतिक आव्हानांचा सामना करणे शक्य होईल.

शिक्षण प्रदान करत असतानाच शैक्षणिक संस्थांनी समाजाप्रति असलेली जबाबदारी पार पाडावी. आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना मदत करणे हे शैक्षणिक संस्थांसह आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. अशा वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून अमृत काळात देशाच्या विकासामध्ये योगदान द्यावे. विद्यापीठाच्या पदवी प्राप्त तसेच शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थिनींची संख्या लक्षणीय असल्याबद्दल विशेष समाधान व्यक्त करुन मुलींच्या शिक्षणातील गुंतवणूक ही देशासाठी मोलाची असल्याचे त्या म्हणाल्या.

उज्ज्वल भविष्याची वाटचाल करत असताना विपरीत परिस्थिती उद्भवल्यास विद्यार्थ्यांनी ज्ञान व आत्मशक्तीने लढावे व आपल्या योग्यतेवर सदैव विश्वास ठेवावा असा संदेश देतांनाच राष्ट्रपतींनी संत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील अभंगाचा दाखलाही दिला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा स्वीकार केल्यामुळे विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात संधी उपलब्ध होत असल्याचा विश्वास व्यक्त करुन राज्यपाल रमेश बैस म्हणाले, पूर्वी ब्रिटीशकालीन मानसिकतेच्या प्रभावातून नोकरीसाठी शिक्षण होते. आता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडत आहेत. विद्यार्थ्यांनी नोकरीसाठी न शिकता जागतिक स्तरावरील विकसित कौशल्य आत्मसात करावे, सोबत एखादी जागतिक भाषा आत्मसात करावी. कुशल मानव संसाधन निर्माण करण्यासोबतच योग शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन या क्षेत्रातील जागतिक संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्यपालांनी केले.

भारतीय संविधान:, उज्ज्वल भवितव्याकडे घेऊन जाणारा सर्व भारतीयांचा शुद्ध धर्मग्रंथ

आपल्या भारतीय संविधानाने आपल्या प्रत्येक भारतीयाला सामाजिक न्याय, स्वतंत्र. समता इत्यादी हक्क बहाल केले आहेत ,त्यामुळे समता न्याय स्वतंत्र प्रदान करणारे भारतीय संविधान हे एक अनमोल ठेवा आहे.कारण कल्याणकारी राज्याची कल्पना संविधानात आहे,प्रत्येकाचा विकास व्हावा या उद्दशाने सर्वांना समान मताधिकार आणि सामान संरक्षण आहे,मानवी मूलभूत अधिकाराला प्राथमिकता दिल्याने सर्व सामान्यांना आपला नायक वाटावा असे सर्व काही असल्याने हृदयात जपून ठेवावे असे आपले संविधान आहे .

जगातील सर्वात मोठी लोकशाही गेली कित्येक वर्ष येथे सुखात नांदत आहे तो देश म्हणजे आपला भारत देश आहे .भरता सोबत मुस्लिम बहुसंख्याकांच्या नवीन पाकिस्तान हे राष्ट्र निर्माण झाले परंतु अवघ्या दहा अकरा वर्षात संसदीय पद्धती ऐवजी राष्ट्रपती पद्धत अमलात आली,कधी लोकप्रतिनिधी तर कधी सेना अधिकारी यांनी सत्ता मिळवली ,खऱ्या अर्थाने पाकिस्तान भरता सोबत स्वतंत्र झाला परंतु तेथे कट्टर धर्म व्यवस्था असल्यामुळे लोकशाही रुजू शकली नाही परंतु त्याच वेळी आपल्या देशात विविध धर्म,पंथ,विविध भाषा,विविध विचारधारा असताना देखील लोकशाही अबाधित आहे, स्वातंत्र्यानंतर भारताची अधिक वेगाने प्रगती सुरू आहे,हे कशामुळे ? तर उत्तर एकच आणि ते म्हणजे आपले भारतीय संविधान आणि या देशातील लोकशाहीवादी असणारी भारतीय जनता.

भारतीय संविधानाच्या सरनामा अर्थात प्रास्ताविकात सर्व भारतीयांना सामाजिक आर्थिक,आणि राजनैतिक न्याय तसेच व्यक्तीच्या समान दर्ज्याची समानता देण्याचा निर्धार यातून व्यक्त झालेला दिसतो.भारतीय संविधानाने भारतीय नागरिकाला दिलेले ते एक अभिवचन आहे,आपल्या संविधानाचे प्रत्येक नागरिकाला सामाजिक न्याय,समता, व हक्क बहाल करणे हे उद्दिष्ट आहे त्यामुळेच माणसाला न्याय स्वतंत्र प्रतिष्ठा प्रदान करणारे भारतीय संविधान हे एक महान ठेवा आहे

भारतीय संविधान या कडे शुद्ध हेतूने पाहता असे लक्ष्यात येते की ही राज्य घटना एक तत्व प्रणाली आहे .जीवन खऱ्या अर्थाने कसे जगावे तो जगण्याचा मार्ग म्हणजे संविधान होय भारतीय संविधान सर्समावेशक ,व्यापक व दूरदर्शी आहे या मध्ये प्रत्येक कलमाचा बारकाईने अभ्यास केला असता एवढा मोठा प्रचंड क्षत्रफल असलेला खंड प्राय देशाची प्रशासकीय यंत्रणा नियंत्रित करण्याचे ते एक साधन आहे .प्रेतेक भारतीयाला धार्मिक स्वतंत्र बहाल केल्याने प्रतेक जन आपल्या धर्मातील तत्वे पूजनीय मानतो त्याची पूजा करतो त्याची उपासना करतो,आणि महनून हे संविधान सर्व भारतीयाचा धर्मग्रंथ आहे असे मला वाटते .आणि महणुंन प्रत्येकाला आपल्या धर्मासोबत स्वतंत्र,बंधुता आणि समता न्याय अधिकाराचा पुरस्कार करणारी आणि मूलभूत अधिकार व कर्तव्य याची जाणीव करून देणारी ही राज्य घटना वंदनीय आहे.हे सर्वानाच कबूल करावे लागेल डॉ बाबासाहेब आंबेडकर महंतात भारतीय राज्य घटना लवचिक आहे युद्ध आणि शांती या दोन्ही काळात भारतीयांना एकसंघ ठेवण्याचे सामर्थ्य या संविधानात आहे बाबासाहेबांच्या या वक्तव्याचा अनुभव भारतीयांनी अनेक वेळा घेतला आहे.

पिढी दर पिढी विचार बदलतात ,संघर्ष सुरू होतो,लवचिक असणे हे सर्वात मोठे वैशिष्ठे आहे कारण वादळात मुळासकट जमीनदोस्त होणारे मोठे वृक्ष आणि त्याच वेळी वाऱ्यासोबत वेल मात्र लवलावत असते .भारतीय राज्य घटनेबद्दल गौरउद्गार काढताना अमेरिकेतील कर्नोल विद्यापीठातील प्राध्यापक क्लिंटन रोसितर महंतत मी जन्मभर राज्यशास्त्र शिकविले परंतु लोकशाही समाज व्यवस्थेत मागमूस नसताना लोकशाही कोठे नदलेली मी पाहिलेली नाही परंतु भारत हा एकच देश याला अपवाद आहे,विविध विचारधारा विविध धर्म.विविध भाषा यांना एका धाग्यात बांधून लोकशाही टिकविणे हे आश्चर्य आहे, आम्ही भारताचे लोक ,भारताचे एक सार्व भौम ,समाजवादी,धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्तक राष्ट्र म्हणून करतो असाच ठराव येथे मांडण्यात आला आहे.

संविधानाच्या कलमकडे पाहता राज्य घटनेने बहाल केलेल्या अधिकाराची दक्खल घेणे गरजेचे आहे.१.सर्वांना समान अधिकार - कलम १४,१५,१६,१७ नुसार

२.सर्वांना स्वत्र्याचा अधिकार - कलम १९,२०,२१,२२ नुसार ३.शोषण विरोधी अधिकार - कलम २३,२४ नुसार४.धर्म स्वातंत्र्याचा अधिकार - कलम २५,२६,२७,२८ नुसार ५. सांस्कृतिक ,शैशनिक अधिकार कलम २९,३० नुसार ६.घटनात्मक अधिकार हकक अभाधित ठेवण्याचं अधिकार कलम ३२,३३,३४,३५ नुसार

भारतीय संविधान याने प्रतेक भारतीय यांना दिलेले हे अधिकार पाहता हे संविधान सर्व भारतीयाचा धर्मग्रंथ आहे अस मला वाटते. **डॉ. गजपाल इंगोले, मुंबई.**

विदर्भाच्या विकासात विद्यापीठाचे मोलाचे योगदान आहे. विदर्भ हा महाराष्ट्राचा विकसनशील भाग असून विद्यापीठाच्या माध्यमातून स्थानिक गरजांनुसार संशोधन होण्याची गरज आहे. विद्यापीठाने गुणवत्ता राखत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करावे. विदर्भातील थोर संत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज यांचा आदर्श ठेवत विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण व संस्कार मिळेल अशी पद्धत विकसित करावी, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. भविष्यात शिक्षणालाच महत्त्व आहे. प्रधानमंत्र्यांनी शिक्षणाचे संपत्तीत रूपांतर करण्याचे आवाहन केले आहे. शिक्षणामुळेच जागतिक आर्थिक महासत्तेचे देशाचे स्वप्न साकार होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

गुणात्मक मनुष्यबळ तयार करणे ही काळाची गरज आहे. जागतिक स्तरावर बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करू शकेल अशी युवापिढी घडविण्याचे आव्हान नागपूर विद्यापीठाने स्वीकारावे,असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. हे विद्यापीठ नवसंशोधनाचे केंद्र म्हणून विकसित होत असून स्टार्टअप इको सिस्टीममध्ये महाराष्ट्राने देशात पहिला क्रमांक पटकाविला आहे. नागपूर विद्यापीठातही नव संशोधन आणि स्टार्टअप इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून उत्तम कार्य सुरु आहे. शकत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठात नवसंशोधन तसेच सर्वांगीण विकासासाठी १०० कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. नवीन आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यापीठ सज्ज असल्याचा विश्वास श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला . विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखेतून डि.एससी. पदवी प्राप्त करणारे डॉ. रामचंद्र हरीसा तुपकरी आणि डॉ. टि. व्ही. गेडाम सुवर्णपदक आचार्य पदवी प्राप्त विद्यार्थिनी राजश्री ज्योतीदास रामटेके यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पदक देऊन गौरविण्यात आले. विद्या शाखानिहाय १२९ संशोधकांना या कार्यक्रमात आचार्य पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. कुलगुरु डॉ सुभाष चौधरी यांनी प्रास्ताविक केले.

दुष्काळाची दाहकता कमी

१६ तालुक्यात मध्यम स्वरुपाचा दुष्काळ जाहीर केला आहे. काही भागात अतिवृष्टी, तर काही भागात कमी पाऊस, सध्या अवकाळी पावसामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून मदत दिली जात आहे. त्याचबरोबर राज्यातील विविध भागात सामाजिक संस्था दुष्काळाची दाहकता कमी करण्यासाठी मोलाचे कार्य करीत आहेत. त्या पुढे म्हणाल्या, दुष्काळात पिण्याचे पाणी, चारा टंचाई, बेरोजगारी इत्यादी परिस्थितीला सामोरे जावे लागते. बेरोजगारीमुळे वंचित घटक, आदिवासी, शेतमजूर आदी घटकातील नागरिक मोठ्या प्रमाणात स्थलांतर करतात. याची सर्वाधिक झळ महिला, जेष्ठ व्यक्ती, मुलांना बसते. त्यांचे स्थलांतर रोखून त्यांना रोजगार हमी योजनेअंतर्गत काम मिळवून देणे, त्यासाठी त्यांना जॉब कार्ड मिळवून देणे आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले.

शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, कृषी पंपाच्या वीजबिलात सूट, आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर होतो का आदींची माहिती संस्थांनी निर्दशनास आणावी. दुष्काळ निवारणाच्या कामात स्वयंसेवी संस्था व शासकीय यंत्रणा यांच्यामध्ये समन्वय ठेवून जास्तीत जास्त दुष्काळग्रस्तांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहचविण्यात याव्यात. संस्थांनी सक्षम होऊन चांगल्या प्रकारे सर्वेक्षण करावे. कामे करताना अडचणींना सामोरे जावे लागू नये यासाठी संस्थांच्या प्रतिनिधींना ओळखपत्र देण्यात यावे. दुष्काळाच्या परिस्थितीतही शाश्वत विकास कसा राहील, याची सर्वांनीच दक्षता घ्यावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.यावेळी श्री. कुलकर्णी आणि श्रीमती पाठक यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. तसेच विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी आपापल्या भागातील दुष्काळाची परिस्थिती सांगितली.

आमदार प्रकाश सोळंके यांच्या

बांधकाम करण्यात आले. दरम्यान त्यामुळे या रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम देखील वादग्रस्त ठरले होते. या इमारतीला माजलगाव नगरपालिकेचा बांधकाम परवाना हा ६/०१/२०२३ चा आहे. तसेच बॉम्बे नर्सिंग ॲक्टनुसार २१ जून २०२१ रोजी १०० बेड्सच्या या रुग्णालयाला परवाना देण्यात आला होता. पण या इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याची बाब यावेळी निदर्शनास आली आहे.

राष्ट्रवादीमध्ये फूट पडल्यानंतर प्रकाश सोळंके यांनी अजित पवार गटासोबत जाण्याचा निर्णय घेतला. दरम्यान कर्जतमध्ये आयोजित करण्यात आलेल्या चिंतन शिबीरात प्रकाश सोळंके यांच्या कार्याध्यक्षपदामुळे राजकीय वर्तुळात बरीच चर्चा झाली. त्यानंतर प्रकाश सोळंके यांनी देखील यावर प्रतिक्रिया दिली. पण त्याचवेळी त्यांच्या रुग्णालयाचा देखील परवाना रद्द करण्यात आला. वैद्यकीय तपासणीत काही त्रुटी आढळून आल्याने प्रकाश सोळंके यांच्या रुग्णालयावर ही करावाई करण्यात आल्याची माहिती समोर आलीये. त्यामुळे पुन्हा एकदा याची जोरदार चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगू लागलीये.

'मुख्यमंत्री- माझी शाळा,

मंत्री श्री. केसरकर म्हणाले, दत्तक शाळा योजनेत मोठमोठे उद्योग समूह सीएसआर (सामाजिक उत्तरदायित्व) निधीच्या उपयोगातून शाळांमध्ये पायाभूत सोयी - सुविधा अद्ययावत करून देणार आहेत. या योजनेतून कुठल्याही प्रकारे शाळांचे खाजगीकरण करण्यात येणार नाही. केवळ शाळांमध्ये चांगल्या दर्जाच्या पायाभूत सोयीसुविधा अद्ययावत करण्याचा यामागील उद्देश आहे. महावाचन उत्सव - महाराष्ट्रातील वाचन चळवळ या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना वाचनातून प्रगल्भ करण्याचा उद्देश आहे. उच्च शिक्षण विभागाच्या राज्यात असलेल्या विविध ग्रंथालयांना या उत्सवासाठी शाळांसोबत संलग्न करण्यात येणार आहे. वाचन उत्सवातून विद्यार्थ्यांचा प्रतिसादही जाणून घेण्यात येणार आहे.

माझी शाळा - माझी परसबाग उपक्रमाविषयी माहिती देताना मंत्री श्री. केसरकर म्हणाले, या उपक्रमातून शाळांमध्ये परसबाग तयार करण्यात येत आहे. शाळांमध्ये परसबाग असणे सक्तीचे करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शेतीबद्दलचे ज्ञान वाढेल, त्यांना प्रत्यक्ष अनुभव घेता येईल, शेतीबद्दलचे आकर्षण वाढेल. परसबागेत भाजीपाला उत्पादनासाठी कृषी विभागामार्फत बिया पुरविण्यात येतील. परसबागेत उत्पादित भाजीपाल्याचा समावेश 'पोषण आहार' मध्ये करण्यात येईल. यात आठवड्यातून एक दिवस अंडी, भात किंवा भरडधान्यापासून बनविलेल्या पदार्थाचा समोवश करण्यात येणार आहे. ते पुढे म्हणाले, स्वच्छता मॉनिटर उपक्रमाचा दुसरा टप्पा सुरू करण्यात येणार आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेचा संस्कार रुजत आहे. स्वच्छतेसाठी विद्यार्थी आग्रही होत आहेत. हा सकारात्मक बदल दिसून येत आहे. शालेय शिक्षण विभागाच्या महत्त्वाच्या उपक्रमांचा शुभारंभ ५ डिसेंबर रोजी होत आहे. या उपक्रमांमध्ये शाळांनी उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, असे आवाहनही मंत्री दीपक केसरकर यांनी यावेळी केले.

विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासनाच्या योजना घराघरात पोहोचवा

केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड

छत्रपती संभाजीनगर : विकसित भारत संकल्प यात्रा २६ जानेवारी २०२४ पर्यंत देशाच्या सर्व भागात जाणार आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरासह जिल्हाभरात विकसित भारत संकल्प यात्रा' च्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना घराघरात पोहोचवा, असे आवाहन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी केले.

इटावा (ता. गंगापूर) येथे विकसित भारत संकल्प यात्रेनिमित्त आयोजित कार्यक्रमात केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. कराड बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे, जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी ओमप्रकाश रामावत, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष एल.जी. गायकवाड, गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे, सहायक गटविकास अधिकारी डॉ. स्नेहल शेलार, सरपंच कैलास शिनगारे, उपसरपंच बाबासाहेब घुले, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक मंगेश केदार, सामाजिक कार्यकर्ते संजय खांबायते, दीपक बडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. कराड म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून विकसित भारत संकल्प यात्रा' आयोजित करण्यात आली आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ गावातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे तसेच या माध्यमातून लाभार्थी कुटुंबाच्या जीवनात बदल घडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासनाच्या सर्व योजनांची माहिती प्रत्येक गावापर्यंत पोहोचवा. विविध योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी मिशन मोडवर काम करा, असे ते यावेळी म्हणाले.प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना लाभ देण्यात येत आहे. राज्यातील नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे त्यांना आवश्यक ते उपचार मिळावेत यासाठी जनतेला पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सोयही शासनाने केली आहे.

शासनाच्या योजनांचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी डीबीटीद्वारे निधी वितरण करण्यात येत आहे. आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री आवास योजना,उज्ज्वला गॅस योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना यासह केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबवा, असे निर्देश त्यांनी सबंधित यंत्रणेला दिले.आपल्या देशाला जगातील पहिल्या क्रमांकाचा देश बनविण्याचा संकल्प प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केला आहे. यासाठी देशातील प्रत्येकाने आपल्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम करावे.शासन आपल्या पाठीशी आहे, असे डॉ.कराड यांनी सांगितले.

अपर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांनी विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा घेता येईल व योजना गावागावात पोहोचविण्यासाठी ही संकल्प यात्रा आपल्या गावात आली असल्याचे सांगून योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रामवत यांनी संकल्प यात्रेचे आयोजन व विविध योजनांची माहिती दिली.यावेळी कार्यक्रमात लाभार्थ्यांना विविध योजनांच्या लाभाचे डॉ.कराड यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. यावेळी लाभार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ग्रामस्थ व विविध विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

४ लाख ३१ हजार रुपयाचे गावठी दारू बनविण्याचे रसायन जमीनदोस्त

नळदुर्गचे सपोनि स्वप्नील लोखंडेची धडाकेबाज कामगिरी

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : धाराशिव जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक गैहर हसन तुळजापूरचे उप विभागीय पालीस अधिकारी निलेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नळदुर्ग येथुन जवळच असलेल्या येडोळा येथे मिळालेल्या गोपनिय माहितीनुसार येडोळा ते लोहगाव हद्दीत गावठी

दारू गाळण्याचा भट्ट्या चालू आसल्याचे माहिती मिळाल्यानंतर तुळजापरचे उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश देशमुख यांना कळवून फिर्यादी दिगंबर राजेंद्र नेलवाडे अविनाश महादेव दांडेकर दत्तात्रय माणिक कुंभार यांच्या फिर्यादी नुसार नळदुर्ग ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक स्वप्नील लोखंडे , सहाय्यक पोलीस निरीक्षक तायवडे , सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरज देवकर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी पोलीस पथकासह सदर ठिकाणी छापा टाकून तब्बल ४ लाख ३१ हजार ३०० रुपयचे गावठी दारू बनविण्याचे रसायन पंचासमक्ष जमीनदोस्त करण्यात आले नळदुर्ग येथील सपोनि स्वप्नील लोखंडे यांची धडाकेबाज कामगीरी केली आसुन सदरील आरोपी १) लक्ष्मी प्रकाश आडे रा येडोळा २) राजू धोंडिबा राठोड वय २२ वर्ष ३) संजय सिद्धू राठोड वय ४० वर्ष ४) जालींदर रेवण पवार वय ५० वर्ष हे सर्व राहाणार येडोळा यांच्या विरुद्ध गुन्हा रजि ५५० / २०२३ कलम ६५ (ई) (फ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम २) गुन्हा रजि नं ५५१ / २०२३ कलम ६५ (इ) (फ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम ३) ५५२ १२०२३ कलम ६५ (इ) (फ) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम नुसार आरोपीवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे . यावेळी उप निरीक्षक झराड , जाधव , राठोड गायकवाड , शिंदे , धनंजय वाघमारे , अमर जाधव , जांभळे , जमादार, फुलसुंदर कुंभार , निलवडे , दांडेकर अदिसह सापळा रचून गोर गरीबांचा नाश करणारी गावठी दारू बनविण्याचे ४ लाख ३१ हजार ३०० रुपयचे रसायन जमीनदोस्त करण्यात आले

संविधान दिन साजरा न करणाऱ्या कार्यालयांना तहसीलदारांची नोटीस

कळंब/प्रतिनिधी : संविधान दिना दिवशी कळंब येथे अनेक शासकीय कार्यालय बंद असल्याचे निदर्शनास आले होते. याविषयी सामाजिक कार्यकर्ते राहुल मुळे यांनी तक्रार दाखल करून संबंधित कार्यालय प्रमुख यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. या गंभीर विषयाची कळंब तहसीलदार यांनी तात्काळ दखल घेऊन कळंब शहरातील सर्व शासकीय कार्यालय प्रमुख यांना संविधान दिन साजरा केला किंवा कसे याचा फोटोसह स्पष्ट अहवाल तात्काळ दोन दिवसाच्या आत सादर करण्याचे आदेश दिले. ज्यामध्ये मुख्याधिकारी नगरपरिषद, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तालुका कृषी विभाग, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, गट शिक्षणाधिकारी, पशुधन विकास

अधिकारी, उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग, महिला व बाल विकास अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना ग्रामीण प्रकल्प, दुय्यम निबंधक, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, उप अभियंता दूरसंचार निगम लि, उप अभियंता म.रा.वी.वी कंपनी, तालुका आरोग्य अधिकारी, उपाधीक्षक भूमी अभिलेख, आगार प्रमुख म.रा.प.मं प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय, अधीक्षक शासकीय वसतिगृह, वैद्यकीय अधिकारी शासकीय रुग्णालय, सामाजिक वनीकरण पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी कळंब या सर्व कार्यालयांचा यामध्ये समावेश आहे संविधान दिन या दिवशी बंद असलेले शासकीय कार्यालय काय अहवाल पाठवतात याकडे कळंब तालुक्याचे लक्ष लागले आहे.

नाईलाज या काटेरी कुंपणात अडकलेली स्त्री 'बालगीन'

कल्याण/दिनेश घनघाव : राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागाकडून संपन्न होणारी ६२ व्या राज्य नाट्य हौशी नाट्य स्पर्धेत कल्याण केंद्रात

प्रेम जाधव व मीनाक्षी पाटील लिखित 'बालगीन ' हे नाटक जल्लोषात संपन्न झाले. या नाटकाचा विषय अतिशय गंभीर होता. 'रघु 'हा विडी आणि दारू सेवन करणारा व्यसनाधीन. त्याची पत्नी बकुळा ही गरोदरपणात मदत म्हणून आपल्या बहिणीला अर्थात सुशिलेला बोलावते. परंतु रघुची नियत बिघडते. त्याचा डोळा त्याच्या मेहुणीवर पडतो. आणि तिच्याशी लग्नाची मागणी करतो. परंतु ती स्पष्ट नकार देते. रघुची पत्नी बाळंतपणात मुलाला जन्म देऊन मरते. त्यामुळे सगुणाची इच्छा नसताना ती त्या मुलाचा सांभाळ करण्यासाठी नाईलाजाने थांबते. अर्थात बालगीन होते.असे कथानक या नाटकाचे आहे. रघुची भूमिका आनंद जाधव यांनी लिलया पेलली आहे. शेवटपर्यंत दारुड्याची बेरींग सोडली नाही. बकुळाचा अर्थात रेश्मा थळे हिचा गरोदरपणाचा अभिनय स्वाभाविक वाटला. यात सगुणाच्या (अक्षता दातखीळ) नृत्यच्या इंट्रीने सर्वांची मने जिंकली आणि सगुणा हे पात्र लोकांच्या मनात घर करून गेले.

महामानवास महापरिनिर्वाण दिनी सहा तास वाचन उपक्रमाद्वारे बार्टी अभिवादन करणार

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे संस्थेचे महासंचालक मा सुनिल वारे विभागप्रमुख डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंड, भारताचे संविधान, बुद्ध आणि त्यांचा धम्म, इतर महापुरुषांच्या जीवनावरील मौल्यवान पुस्तके ८५ टक्के सवलतीच्या दरात अनुयायांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील विश्ववविख्यात उच्च विद्याभुषित ज्ञानाचे प्रतीक असुन त्यांना सिम्बॉल ऑफ नालेज म्हणून अमेरिकेतील कोलंबिया विश्व विद्यापीठाने गौरवले आहे.

वाचाल तर् वाचाल असा कृतिशील संदेश देणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी पुस्तकासाठी राजगृह उभारले. त्यामध्ये ५० हजार दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह होता. बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेची निर्मिती करून या देशात न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चतुसूत्रीतून प्रत्येक भारतीय नागरिकास प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राष्ट्रनिर्माते असून ६ डिसेंबर रोजी महापरिनिर्वाण दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये, नागरिकांमध्ये, अनुयायांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी याकारिता बार्टी या वर्षी ६ डिसेंबर २०२३ रोजी बार्टी पुणे मुख्यालयातील ग्रंथालय, बार्टी, येरवडा संकुल ग्रंथालय, बार्टीचे डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड येथील ग्रंथालय, तसेच राष्ट्रीय स्मारक मुक्तीभुमी, येवला, बार्टी उपकेंद्र नागपुर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत ६ तास वाचन उपक्रम राबवून महामानवाला अभिवादन करणार आहेत. अनुयायी विद्यार्थी, नागरिकांनी बार्टीच्या ६ तास डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखाण आणी भाषणे वाचन करून या संकल्प दिन उपक्रमात सहभागी व्हावे व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करावे. बार्टी मुख्यालयास आपण ६ तास वाचन उपक्रमात सहभाग नोंदवीला याबद्दल छायाचित्रे पाठवून कळवावे, असे आवाहन बार्टीतर्फे करण्यात आले आहे. राज्यभरात या उपक्रमात सहभागी सर्व वाचनालये, ग्रंथालये, समाज मंदिर किंवा प्रार्थनास्थळे यांनी हा उपक्रम राबाविल्याची यादी बार्टीच्या अधिकृत फेसबुक पेज वर प्रदर्शित करण्यात येणार आहे. या उपक्रमाची संकल्पना प्रकाशन प्रसिद्धी विभागाचे प्रकल्प व्यवस्थापक श्री सुमेध थोरात यांनी मांडली.

पंढरपूर नगर परिषदेच्या करवाडीच्या विरोधात सर्वपक्षीय नेते मंडळी एकत्र

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर शहरातील नागरिकांना नागरी सुविधा मिळत नाहीत नगरपरिषदेकडून फक्त दहा टक्के कर वाढ केल्याचे सांगण्यात आले आहे मात्र प्रत्यक्षात काही ठिकाणी २७ ४० ७० १०० तर ४००% कर वाढ झाले आहे यामुळे शहरातील विविध पक्षांचे नेते मंडळी व पदाधिकाऱ्याकडून मुख्याधिकारी ड्रॉ प्रशांत जाधव यांना घ्यावा घालण्यात आला

पंढरपुरातील सर्व रस्ते खराब आहेत पिण्याचे पाणी अस्वच्छ पद्धतीचे मिळत आहे आरोग्य बाबत सुविधा नाहीत शिक्षणाचा विशेष कर लावला आहे मात्र पंढरपूर आतील शाळा बंद आहे वृक्ष लागवडीचा कर मात्र वृक्ष लागवडीचे कर आकारण्यात येतो पण नागरी सुविधा देत नाहीत कर वाढवला जातो हा चुकीचा निर्णय आहे करवाडीला स्थगिती देण्यात यावी अन्यथा जनआंदोलन करणार असल्याचा इशारा श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी दिला आहे

यावेळी शिवसेनेचे नेते साईनाथ अभंगराव माजी नगरसेवक आदित्य फत्तेपुरकर कोळी समाजाचे नेते अरुण कोळी राष्ट्रवादीचे सुधीर भोसले माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले संदीप मांडवे महादेव धोत्रे ऋषिकेश भालेराव धनंजय कोतकर काँग्रेसचे नेते नागेश गंगेकर संजय बाबा ननवरे अँड दत्तात्रय पाटील अभिजीत पाटील माने बापू शिंदे राष्ट्रवादी शहराध्यक्ष तालुकाध्यक्ष तसेच काँग्रेसचे शहराध्यक्ष तालुकाध्यक्ष शिवसेना उद्धव ठाकरे गट यांची तालुकाध्यक्ष व नेते यांच्यासह महाविकास आघाडी पक्षाचे आणि नेते गान उपस्थित होते.

दुष्काळग्रस्त पंढरपूर तालुका करवाड पंढरपूर तालुक्याला दुष्काळग्रस्त तालुका म्हणून जाहीर करण्यात आला आहे ग्रामीण भागातील नागरिकांना कर माफ केला जातो शिक्षण फी माफ केली जाते विद्युत बिलात सवलत दिली जाते मात्र पंढरपूर शहरात सवलती मिळणे व नागरिकांचे कर माफ करा होणे गरजेचे असतानाही नगर परिषदेकडून कर वाढ करण्यात आली आहे हे योग्य नसल्याचे राष्ट्रवादीचे नेते तथा श्री विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सांगितले आहे

नागरिकांपेक्षा आमदारांना त्यांचा पक्ष महत्त्वाचा गल्लीपासून दिल्लीपर्यंत पासून विद्यमान आमदाराचे सरकार आहे परंतु सर्वसामान्य जनतेची पिळवणूक करण्याचे त्यांच्या पक्षाचे धोरण आहे यामुळे या धोरणामुळे काम करत आहेत शहरातील नागरिकांपेक्षा आमदारांना त्यांचा पक्ष महत्त्वाचा आहे त्यामुळे ते आवाज उठवत नाहीत परंतु आम्ही आवाज उठवणार असल्याचे राष्ट्रवादी नेते तथा श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सांगितले

चिंचणी पुनर्वसन गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत मंजूर आता शासनाच्या लोक उपयोगी विविध योजना राबवणार : मोहन अनपट

पंढरपू/प्रतिनिधीः पंढरपूर तालुक्यातील चिंचणी या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत मंजूर झाली असून राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाकडून अधिसूचना जारी करण्यात आले आहे यापूर्वी चिंचणी या गावच्या पिराची कुरोली मध्ये समावेश होता आता शासनाने स्वतंत्र ग्रामपंचायत मंजूर केल्यामुळे पंढरपूर तालुक्यांमध्ये आणखी एक नवीन ग्रामपंचायत भर पडलेली आहे

चिंचणी या गावाचे यापूर्वी ग्रामपंचायत नसतानाही वेगवेगळी ग्राम ग्रामविकासाचे कामे करत स्वच्छ सुंदर हरित गाव म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केलेली आहे या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत नसल्यामुळे शासनाच्या अनेक पुरस्कारापासून वंचित राहावे लागत होते आता हा मार्ग मोकळा होणार आहे यापूर्वी शासनाच्या वतीने चिंचणी ला वनश्री छत्रपती शिवाजी महाराज या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे स्वच्छ शाळा सुंदर शाळा या अभियानात चिंचणी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांक आला होता या गावाला पर्यटनाचा क वर्ग दर्जा देण्यात आलेला असून लोकसभा लोक वर्गणी व शासन निधी यांच्या मदतीने या गावचे चिंचणी ग्रामीण कृषी पर्यटन केंद्र सुरू केले आहे या पर्यटन केंद्राला पर्यटन संचालनालय यांचे मान्यता असून हे केंद्र गावाच्या वतीने चालवली जाते सोलापूर जिल्ह्यातील अनेक गावापुढे या गावाने समृद्ध असा गाव हे स्वयंपूर्ण गाव म्हणून एक वेगळी आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केलेला आहे या सगळ्या नाविन्यपूर्ण कामाची दखल घेत शासनाच्या वतीने चिंचणी या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत मंजूर केली असून तशी आधी सूचना ग्रामविकास विभागाकडून जाहीर करण्यात आलेली आहे यामुळे चिंचणी ह्या गावच्या विकासामध्ये आणखी भर पडणार आहे गेल्या अनेक दिवसापासून चिंचणी या गावाची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याची मागणी पूर्ण होताना दिसत

आहे चिंचणी स्वतंत्र ग्रामपंचायत मंजुरीसाठी गेल्या अनेक वर्षापासून आम्ही राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत होतो चिंचणीची स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन कोणीही आम्हाला सर्वात आनंद देणारी घटना आहे यामुळे या गावच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार आहे विस्थापित गाव आहे म्हणून फक्त रणगाडे न गाता स्वतंत्र ग्रामपंचायत आणि ग्रामीण पर्यटनाच्या माध्यमातून गावाला समृद्ध व स्वयंपूर्ण करणे हाच आमचा साम सामूहिक प्रयत्न राहील आमच्या या प्रयत्नांना भरत पाटणकर आ. बबन दादा शिंदे आ. सुभाष बापू देशमुख ग्रामपंचायत पिराची कुरोली जिल्हा परिषद सोलापूर पंचायत समिती व महसूल विभाग पंढरपूर यांच्या सहकार्याने मिळाले आहे

मत्स्यव्यवसाय व्यवस्थापनासह संवर्धनाबाबत इंडियन ओशन टुना कमिशनमध्ये होणार चर्चा

मुंबई : टुना मत्स्यपालन क्षेत्रात सुधारित आणि सुयोग्य व्यवस्थापनाची गरज आहे. याशिवाय, मत्स्यव्यवसाय संवर्धनासाठी विविध देशांच्या एकत्रित प्रयत्नांची गरज हिंद महासागर टुना आयोगाच्या (इंडियन ओशन टुना कमिशन) मुंबई येथे आयोजित बैठकीत व्यक्त करण्यात आली. या परिषदेत सहभागी असलेल्या विविध देशांच्या मान्यवरांनी आज भाऊचा धक्का, मुंबई येथे व तेथील मासळी बाजारास भेट दिली. दरम्यान, आयोगाच्या मुख्य वैज्ञानिक समितीची बैठक हॉटेल सेंट रेजिस येथे ४ ते ८ डिसेंबर २०२३ दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्री परशोत्तम रुपाला तसेच राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत ४ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी सुरुवात होणार आहे. ट्युना आणि शाश्वत व्यवस्थापनाशी संबंधित वैज्ञानिक शिफारसींसंदर्भात यामध्ये चर्चा होणार आहे.केंद्र शासनाचा मत्स्यव्यवसाय विभाग आणि राज्य शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या वतीने २८ नोव्हेंबरपासून इंडियन ओशन टुना कमिशनच्या १९ व्या डाटा संकलन आणि सांख्यिकी बाबतच्या कार्यकारी समितीच्या बैठकीस सुरुवात झाली. केंद्रीय मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहसचिव नितुकुमारी प्रसाद, केंद्रीय मत्स्यव्यवसाय उपायुक्त संजय पांडे, राज्याचे मत्स्यव्यवसाय आयुक्त अतुल पाटणे, सहआयुक्त महेश देवरे यावेळी उपस्थित होते.जगभरातील टुना मत्स्यपालन क्षेत्रातील नामवंत शास्त्रज्ञ आणि तज्ज्ञांना एकत्र आणणारी ही आंतरराष्ट्रीयस्तरावरील आयोगाची महत्त्वपूर्ण बैठक आहे. ट्युना आणि इतर मोठ्या पेलाजिक प्रजाती, जसे की बिलफिश, शार्क आणि रेस यांचे मत्स्यव्यवसायात आर्थिकदृष्ट्या महत्व आहे. यात टुनाचा मोठा वाटा आहे. या प्रजातींच्या आंतरराष्ट्रीय व्याप्तीसाठी बहुराष्ट्रीय मत्स्यव्यवसायाद्वारे अति मासेमारी करण्याची त्यांची संवेदनशीलता लक्षात घेता, सुधारित व्यवस्थापन आणि मत्स्यव्यवसाय संवर्धनासाठी सर्व राष्ट्रांच्या सहयोगी प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे मत यावेळी विविध मान्यवरांनी व्यक्त केले.या बैठकीकरिता इंडोनेशिया, फ्रान्स, स्पेन, युरोपियन युनियन देश, सेशेल्स, टांझानिया, इराण, थायलंड, जपान, श्रीलंका, ओमान आणि भारत या देशांतील प्रतिनिधी उपस्थित होते. याशिवाय, इतर विविध देशांतील अनेक प्रतिनिधी आणि वैज्ञानिक संस्था दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे देखील बैठकीला उपस्थित आहेत.मत्स्यव्यवसाया संदर्भातशास्त्रज्ञ विविध देशांनी केलेला डेटा संकलन, आणि आयोगाला अहवाल देण्यासाठी अवलंबलेल्या विद्यमान वैज्ञानिक पद्धतींवर विचारमंथन आणि विश्लेषण करत आहेत आणि हिंद महासागर क्षेत्रातील डेटा/माहिती संकलन आणि आकडेवारीच्या प्रगत आणि सरलीकृत पद्धती तयार करणार आहेत. आजच्या बैठकीनंतर प्रतिनिधींच्या भाऊचा धक्का, मुंबई येथे व तेथील मासळी बाजारास भेटीचे नियोजन सहआयुक्त महेश देवरे, सहाय्यक आयुक्त संजय माने, मत्स्य व्यवसायविकास अधिकारी अशोक जावळे यांच्यासह नीरज चासकर, रवी बादावार, निखिल नागोठकर, दीपाली बांदकर, सागर कुवेस्कर यांनी भरीव प्रयत्न केले आहेत. या भेटी दरम्यान मान्यवरांनी तेथील नौकांची पाहणी केली तसेच टुना/ कुपा हा मासा किती प्रमाणात बाजारात येतो. त्याची मासेमारी याची पाहणी केली.

ग्रामस्थांनी सुचवलेल्या प्रत्येक अडचण सोडण्यास मी कटिबद्ध : आ. सचिन कल्याणशेट्टी

अक्कलकोट/प्रतिनिधीः करजगी गावच्या चौफेवर विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही ग्रामस्थांनी सुचवलेल्या प्रत्येक अडचण सोडण्यास मी कटिबद्ध असून मुंबईचे बंदर विश्र्वास ठेवून प्रचंड मतांनी विजयी केलात असेच प्रेम आशीर्वाद त्यांच्या पाठीशी अखंडपणे ठेवण्याचे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. ते करजगी ता.अक्कलकोट येथे तालुक्यातील नवनिर्वाचित अठरा गावच्या सरपंचासह सर्व सदस्य बाजार समिती सभापती विकास सेवा सोसायटी चेअरमन यांचे भव्य नागरी सत्कार सह विविध विकास कामाचे शुभारंभ करण्यात आले यावेळी आयोजित कार्यक्रमात आमदार सचिन कल्याणशेट्टी बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर खासदार डॉ जय सिद्धेश्र्वर महास्वामीजी म नि प्र शिवानंद महास्वामीजी करजगी आमदार सचिन कल्याणशेट्टी स्वामी समर्थ साखर कारखान्याचे चेअरमन संजीवकुमार पाटील व्हाईस चेअरमन आप्पासाहेब पाटील शिवानंद पाटील भाजपा तालुका अध्यक्ष मोतीराम राठोड शहर अध्यक्ष शिवशरण जोजन परमेश्र्वर यादवाड मल्लिनाथ स्वामी शिवसिद्ध बुळा अशोक हिप्परगी प्रकाश हिप्परगी सुरेश सारणे महेश हिंदोळे श्रीशैल घीवारे आधी उपस्थित होते.

पुढे बोलताना आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले करजगी गावच्या यंदाच्या ग्रामपंचायत निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले होते. ग्रामस्थांनी गुड्ड्द बसवराज ग्राम विकास पॅनलचे सर्वेसर्वा उंबरजे बंधू वर विश्र्वास ठेवून प्रचंड मताने विजयी केलात या विश्र्वासाला पात्र राहून अत्यंत पारदर्शकपणे कारभार करतील या शंकाच नाही पण तुम्ही ग्रामस्थ त्यांच्या पाठीशी खंबीरपणे सदैव उभे राहावे असे आव्हान करून करजगी गावच्या चौफेरी विकासासाठी मी कटिबद्ध असून आपण सुचवलेल्या कामाला निधी कमी पडू देणार नाही असे सांगून अक्कलकोट ते करजगी करजगी ते सुलेर जवळगे व अक्कलकोट ते तडवळ दूतर्फा रस्त्याचे काम ही लवकरात लवकर मार्गी लावणार असल्याचे कल्याणशेट्टी बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना खासदार डॉ जय सिद्धेश्र्वर महास्वामीजी म्हणाले ग्रामस्थांना सत्कार सन्मानपेक्षा आमदार खासदारांच्या निधीतून विकास काम महत्त्वाचे असून राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली त्यांच्या दातृत्वाने तालुक्यातील प्रत्येक गावात विकास गंगा पोहोचलेला आहे आगामी काळात आणखी निधी लागल्यास कमी पडू देणार नसल्याचे खासदार डॉ जय सिद्धेश्र्वर महास्वामीजी बोलत होते.

यावेळी नगरसेवक महेश शिंदोळे माजी जि प सदस्य शिवानंद पाटील भाजपा माजी तालुका अध्यक्ष मल्लिनाथ स्वामी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले उंबरजय बंधू सामाजिक शैक्षणिक बरोबर राजकारणात प्रवेश केलेला आहे गेल्या पंचवीस वर्षापासून संघर्ष करणाऱ्या उंबरजें बंदुवर यंदा ग्रामस्थांनी विश्र्वास दाखवलेला आहे या विश्र्वासाला पात्र राहून ते कारभार करतील या शंका नाही परंतु त्यांच्या पाठीशी ग्रामस्थांनी सदैव उभे राहावे असे आव्हान प्रसंगी केले. याप्रसंगी रामन्ना अर्वात बाबुराव पाटील सुरेश अर्जुने सुरेश झळकी निलापा शिवमुर्ती कामगोंडा बाकी मल्लिकार्जुन कारले गुरुपाद मलकप्पा इंडी एरंडा गुब्बेड

गेल्या पंचवीस वर्षापासून शिवानंद महास्वामीजी आणि आमच्या परिवाराचे काही किरकोळ वैचारिक मतभेद होते ते ते यंदा दूर झाले असून आता आमचे मनोमिलन झालेले आहे आमचे मतभेद झाले असले तरी त्यांच्यावरील आस्था व प्रेम कमी झालेले नव्हते आणि भविष्यात होणारी नाही मार्गक्रमण करणार असून आमदार सचिन कल्याण शेट्टी व खासदार जयसिद्धेश्र्वर महास्वामीजी भरघोस निधी गावच्या विकासासाठी दिलेला आहे यामुळे खरेदी गावचे वीस वर्षाचे खुंटलेला विकास काम पूर्ण होईल असे मत प्रास्ताविकेत कार्यक्रमाचे संयोजक एडवोकेट दयानंद उंबरजे बोलत होते.

महादेव महाजन निंगाप्पा कलशेट्टी महबूब मुल्ला गुरुपुत्र गंगदे पिंटू पाटील स्वामीनाथ चौगुले मल्लिनाथ डबे मल्लिकार्जुन डबे ज्योती उन्नद चंद्रकला कार्यमुंगी अरविंद भडोळे आदी सह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

याप्रसंगी अक्कलकोट तालुक्यात नुकतेच पार पडलेल्या १८ ग्रामपंचायतीच्या नूतन सरपंच सदस्य व दुधनी व अक्कलकोट बाजार समितीचे सभापती व सर्व संचालक विकास सेवा सोसायटी चेअरमन सह प्रशासित कर्मचाऱ्यांचे सत्कार व सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले यावेळी तालुक्यातील हजारो नागरिक उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पल्लवी पवार तर आभार करजगीचे नूतन सरपंच विवेकानंद उंबरजे यांनी मानले कार्यक्रमाची सुरुवात श्री गुद्दद बसवराज महास्वामीजी यांच्या प्रतिमापूजन प्रदीप प्रजलांनी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

ग्रामपंचायत निवडणुकांचा खर्च पारंपरिक पद्धतीने सादर करता येणार

मुंबई : ग्रामपंचायत निवडणुकांतील सर्व उमेदवार ट्रू व्होटर पबरोबरच आता पारंपरिक पद्धतीनेदेखील (ऑफलाइन) निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करू शकतात, असे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.विविध जिल्ह्यांमधील ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकांसाठी ५ नोव्हेंबर २०२३ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. या निवडणुकांचा निकाल ६ नोव्हेंबर २०२३ रोजी जाहीर करण्यात आला. त्यामुळे बिनविरोध विजयी झालेल्यांसह निवडणूक लढविलेल्या सर्व उमेदवारांनी ६ डिसेंबर २०२३ पर्यंत निवडणूक खर्चाचा हिशेब सादर करणे आवश्यक आहे. नक्षलग्रस्त/ दुर्गम भागात मात्र ७ नोव्हेंबर २०२३ रोजी निकाल जाहीर करण्यात आला. त्यामुळे तेथील बिनविरोध विजयी झालेल्यांसह निवडणूक लढविलेल्या सर्व उमेदवारांनी ७ डिसेंबर २०२३ पर्यंत निवडणूक खर्च सादर करणे आवश्यक आहे.सर्व उमेदवारांना ट्रू व्होटर पद्वारे निवडणूक खर्च सादर करणे बंधनकारक करण्यात आले होते; परंतु त्यात तांत्रिक अडचणी येत असल्याचे अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त झाले होते. त्यामुळे आता ज्यांना ट्रू व्होटर पद्वारे निवडणूक दाखल करणे शक्य नाही, त्यांना पारंपरिक (ऑफलाइन) पद्धतीने देखील निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करता येईल, असेही राज्य निवडणूक आयोगाच्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे.

राजेश टोपेंच्या गाडीवर हल्ला, जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या वादातून दगडफेक

जालना : माजी मंत्री तथा शरद पवार गटाचे आमदार राजेश टोपे यांच्या गाडीवर हल्ला करण्यात आला आहे. राजेश टोपे यांच्या गाडीवर काही वेळापूर्वी दगडफेक करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. अज्ञात तरुणांनी टोपे यांच्या गाडीवर दगडफेक करून त्यानंतर घोषणाबाजी केल्याचे समोर येत आहे. जालना येथील जिल्हा मध्यवर्ती बँकच्या खाली उभा असलेल्या राजेश टोपे यांच्या गाडीवर ही दगडफेक झाली आहे. दरम्यान, या घटनेत टोपे यांच्या गाडीच्या काच्या फुटल्या असून, गाडीजवळ एक लाकडी दांडा आणि ऑइलची बॉटल देखील सापडलेली आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीच्या वादातून ही दगडफेक करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस दाखल झाले असून, याची माहिती मिळताच टोपे समर्थक देखील घटनास्थळी जमा झाले आहेत. जिल्हा मध्यवर्ती बँकच्या निवडणुका सुरु असल्याने टोपे हे बँकेत आले होते. दरम्यान, याचवेळी बाहेर उभी असलेल्या त्याच्या गाडीवर दगडफेक करण्यात आली आहे. आता पोलिसांकडून सीसीटीव्हीची पाहणी करून दगडफेक करणाऱ्यांचा शोध घेतला जाण्याची शक्यता आहे. तर, जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुका होत असून, त्याच वादातून ही दगडफेक झाली असल्याचे टोपे यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, या बाबत बोलतांना राजेश टोपे म्हणाले आहे की, आज जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या चेअरमन आणि व्हाईस चेअरमन पदाची निवडणूक होती. दरम्यान, यावेळी निवडणूक बिनविरोध होण्याची प्रक्रिया पार पडत होती. यासाठी अध्यक्ष आणि उपाध्यक्ष देखील उपस्थित होते. परंतु, काही असंतोष लोकांनी मुद्दामहून गाडीवर दगड मारले. ज्यात गाडीची काच फुटली आहे. त्यामुळे याबाबत पोलिसांनी कारवाई केली पाहिजे. तसेच, ज्यांनी कायदा हातात घेतला असेल त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, असे टोपे म्हणाले आहे.

आम्ही बारामतीमध्ये लढणार, मोदींना पंतप्रधान करण्यासाठी आम्हाला प्रामाणिक राहावंच लागेल

हसन मुश्रीफांनी मांडली भूमिका

कोल्हापूर : उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शरद पवार यांच्यासोबत असलेले अनिल देशमुख हे भाजपसोबत झालेल्या सर्व बैठकांना माझ्यासोबत उपस्थित होते. भाजपला अनिल देशमुख हे मंत्रिपदी नको होते, असा गौप्यस्फोट अजित पवार यांनी केला. आता वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी कोल्हापुरात बोलताना अजित पवारांनी जे सांगितलं ते वस्तूस्थितीला धरून असल्याचे म्हटले आहे. शरद पवार का नकार देत आहेत हे अजित पवार यांना कळलेलं नाही, मग आम्हला कसं कळणार? असेही मुश्रीफ म्हणाले.

अजित पवार गटाकडून रायगड जिल्ह्यातील कर्जतमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचं शिबीर आयोजित करण्यात आलं होतं. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत अजित पवारांनी गौप्यस्फोट केला होता. हसन मुश्रीफ म्हणाले की, आमच्यासोबत अनिल देशमुखही होते. नंतर त्यांनी नकार दिला, त्यांनी इतकं खोटं बोलू नये. अजितदादांना सुपारी द्यायचा प्रश्न येत नाही. प्रफुल्ल पटेल यांनी सविस्तर सांगितलं आहे.

मोदींना पंतप्रधान करण्यासाठी आम्हाला प्रामाणिक राहावंच लागेल हसन मुश्रीफ यांनी आगामी लोकसभेला बारामती लढणार असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, आता जिथं आमचे खासदार आहेत त्या जागा आम्हीच लढवणार आहोत. यामध्ये बारामती

लोकसभेचाही समावेश आहे. बारामतीत गृहकलचा प्रश्न नाही. मोदींना पंतप्रधान करण्यासाठी आम्हाला प्रामाणिक राहावंच लागेल, असेही त्यांनी सांगितले.

अजित पवारांनी केलेल्या गौप्यस्फोटानंतर जितेंद्र आव्हाड यांनी हिंमत असल्यास दुसरा पक्ष काढा, असे आव्हान अजित पवारांना दिले होते. यावर बोलताना त्यांनी सांगितले की, ज्या पक्षात इतकी वर्ष काम केलं, तो पक्ष सोडून दुसरा पक्ष कसा काढणार? जो पक्ष कष्ट करून वाढवला त्याबद्दल वेगळ्या भावना असतात.

दुसरीकडे, अजित पवार यांनी केलेल्या धक्कादायक दाव्यानंतर अजित पवार गट आणि शरद पवार गटात कलगीतुरा रंगला आहे. अजित पवार यांनी आमदार प्रकाश सोळंकेंवरून केलेल्या दाव्यानंतर जयंत पाटील यांनीही खुलासा करत अजित पवार यांना टोला लगावला आहे. त्यांना (प्रकाश सोळंके) मंत्रीच व्हायचं होत. मला मंत्री का केलं नाही म्हणून ते चिडून आले. ते राजीनामा देत होते,

पणं मी त्यांना बोलावलं. त्यावेळी अजित पवारांनी माझ्यासमोरच सोळंखीना सांगितले की तुम्हाला पक्षाचे कार्याध्यक्ष पद देतो, पण नंतर मला कधी पक्षाने तसे सांगितल नाही. मला सांगितलं असतं तर मी राजीनामा दिलाच असता, असे जयंत पाटील यांनी आज (२ डिसेंबर) पुण्यात बोलताना सांगितले.

नव्या वर्षात केंद्रीय कर्मचाऱ्यांना मोठी भेट!

महागाई भत्त्यात ५० टक्क्यांपर्यंत वाढण्याची शक्यता

नवी दिल्ली : मोदी सरकार नव्या वर्षात केंद्रीय कर्मचाऱ्यांना मोठी भेट देण्याची शक्यता आहे. २०२४ च्या सुरुवातीला केंद्र सरकार महागाई भत्ता आणि महागाई सवलत वाढवण्याचा मोठा निर्णय घेऊ शकते. दरवर्षी मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात केंद्र सरकार ४८ लाखांहून अधिक केंद्रीय कर्मचारी आणि ६८ लाख पेन्शनधारकांना त्यांच्या महागाई भत्त्यात आणि जानेवारी ते जून या महिन्यांसाठी महागाई भत्ता वाढवून देते. केंद्र सरकारला जानेवारी ते जून २०२४ या महिन्यांच्या महागाई भत्त्यातही वाढ करण्याची गरज आहे. पण २०२४ मध्ये महागाई भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय मोदी सरकार मार्च महिन्यात नव्हे तर नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच घेऊ शकते. कारण पुढील वर्षी एप्रिल ते मे दरम्यान लोकसभा निवडणुका होणार आहेत.

केंद्र सरकार आपल्या कर्मचाऱ्यांना नवीन वर्षाच्या निमित्ताने महागाई भत्त्यात वाढीची भेट देऊ शकते. केंद्र सरकार दरवर्षी जानेवारी आणि जुलैमध्ये वर्षातून दोनदा डीए वाढवते. -खउझख डेटानुसार, सरकार सातव्या वेतन आयोगाअंतर्गत केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करते. त्यामुळे कर्मचाऱ्यांचा डीए कधी तीन टक्के तर कधी चार टक्क्यांनी वाढतो. आता नव्या वर्षात महागाई भत्त्यात ४ टक्क्यांची वाढ होऊन महागाई भत्ता ५० टक्के होण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारनं दिवाळीपूर्वीच केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ केली आहे. त्यामुळे सध्या महागाई भत्ता ४६ टक्के आहे. सरकारकडून केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यासोबतच पेन्शनधारकांच्या महागाई सवलतीतही वाढ केली जाते. डीए आणि डीआरमधील या वाढीचा थेट परिणाम कर्मचाऱ्यांच्या पगारावर आणि पेन्शनधारकांच्या मासिक पेन्शनवर होतो. सध्या सातव्या वेतन आयोगांतर्गत कर्मचारी आणि पेन्शनधारकांना ४६ टक्के ऊ- आणि ऊ्ठ दिला जात आहे. सरकारने महागाई भत्ता ४ टक्क्यांनी वाढवला तर, महागाई भत्ता आणि सवलत ४६ टक्क्यांवरून ५० टक्के होईल.

केंद्र सरकारचे कर्मचारी आणि पेन्शनधारकांना महागाई भत्ता आणि महागाई सवलतीत ४ टक्के वाढ होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत डीए आणि डीआर ५० टक्क्यांपर्यंत वाढल्यास कर्मचाऱ्यांच्या पगारात आणि पेन्शनधारकांच्या पेन्शनमध्ये वाढ होईल. या वाढीनंतर कर्मचाऱ्यांचे किमान वेतन ९००० रुपयांनी वाढणार आहे. सरकार ही वाढ जानेवारी ते फेब्रुवारी किंवा मार्चनंतर वाढवू शकते.

'राऊत शिवसेनाप्रमुख होण्याचं स्वप्न बघातायत', दादा भुसेंचे घणाघाती आरोप

मालेगाव : संजय राऊत शिवसेनाप्रमुख होण्याचं स्वप्न बघत आहेत, असं म्हणत मंत्री दादा भुसे , यांनी संजय राऊतांवर निशाणा साधला. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मालेगावी केलेल्या आरोपाचा पालकमंत्री दादा भुसे यांनी जोरदार समाचार देखील घेतला. मंत्री दादा भुसे यांनी दाखल केलेल्या अब्रुनुकसानीच्या दाव्यानंतर शिवसेना खासदार संजय खासदार संजय राऊत आज मालेगाव न्यायालयात हजर राहण्यासाठी पोहोचले.

मंत्री दादा भुसे यांच्यावर १७८ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा आरोप राऊतांनी केला होता. त्यावर दादा भुसे यांनी राऊतांवर मानहानीचा दावा केला होता. या दाव्यानंतर संजय राऊत हे शनिवार २ डिसेंबर रोजी मालेगावच्या न्यायालयात हजर राहिले होते. त्यानंतर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर करुन पुढील सुनावणीसाठी ३ फेब्रुवारी ही तारीख दिली. दरम्यान यावेळी खासदार राऊत हे मालेगाव न्यायालयात असाताना ठाकरे गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राऊतांवर जामिनासाठी मालेगावात यावं लागलं. ते काही स्वातंत्र्यसैनिक नाहीत. त्यांनी केलेले आरोप खोटे आहेत. त्यामुळे त्यांना मालेगावात येऊन माफी मागावीच लागेल. राऊतांना मालेगावाची माफी मागावी लागेल, असं म्हणत मंत्री दादा भुसेंनी राऊतांवर निशाणा साधला.

संजय राऊत हे दलाल आहेत. त्यांनी शिवसेनेचं मीठ खाल्लं .शिवसेनेचे मीठ खायचे अन राष्ट्रवादीची दलाली करायची. त्यांना मुख्यमंत्री होण्याची देखील स्वप्न पडत असल्याचा गंभीर आरोप यावेळी मंत्री दादा भुसे यांनी केला. मी देखील बाळासाहेब आणि दिघे साहेबांचा कडवट शिवसैनिक आहे. नोटीशीला मी घाबरत नाही. राऊतांनी इतर ठिकाणी नौटंकी दाखवावी. पोपटपंची करून कोणी आमदार होत नाही त्यासाठी जनतेत जावे लागते. मालेगावचा आमदार कोण होणार

हे राऊत नाही, तर मालेगावची जनता ठरवेल, असं दादा भुसे म्हणाले. ठाकरे गटाचे नेते अद्वय हिरे यांच्यावर जिल्हा बँकेची

फसवणूक केल्याबद्दल कारवाई करण्यात आलीये. यावर देखील मंत्री दादा भुसे यांनी भाष्य केलं आहे. यावेळी बोलताना त्यांनी म्हटलं की, अद्वय हिरेंनी जिल्हा बँकेची फसवणूक केलीये. गोरगरीब कष्टकरी आणि शेतकऱ्यांची लूट केलीये. अशा अद्वय हिरेंची बाजू घेताना राऊतांना लाज नाही का वाटत.

आज देशातील ४ राज्यांचा निकाल

नवी दिल्ली : देशभरात मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ आणि तेलंगणासह मिझोरम या पाच राज्यांच्या निकालाविषयी कमालीची उत्सुकता आहे. एग्झिट पोल्समध्ये (मतदानोत्तर चाचण्यांमध्ये) काँग्रेसला छत्तीसगड आणि तेलंगाणात सत्ता मिळेल, असा अंदाज वर्तवला आहे, मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये भाजपा सत्तेत येईल, असा अंदाज आहे. मिझोराममध्ये सर्व एग्झिट पोल्सने त्रिशंकु स्थितीचा अंदाज वर्तवला आहे.

अशातच आता रविवारी (३ डिसेंबर) यातील ४ राज्यांचा आणि सोमवारी (४ डिसेंबर) मिझोरामचा निकाल लागणार आहे.